देशोन्नती

# उमवित क्विक हिल सायबर वॉरिअर क्लबची स्थापना

देशोन्नती वृत्तसंकलन

जळगाव : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्यातील सामंजस्य करारानुसार क्विक हिल सायबर वॉरिअर क्लब ऑफ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना करण्यात आला आहे.

सायबर सुरक्षेच्या जनजागृती अंतर्गत स्थापन केलेल्या या क्लब मध्ये चार सदस्यांची नेमणुक करण्यात आली असून त्यामध्ये अध्यक्ष पायस सावळे, सेक्रेटरी मयुर बडे, अॅक्टीव्हीटी डायरेक्टर रेवती फिरके, पीआर डायरेक्टर प्रगती कोल्हे व शिक्षक समन्वयक प्रा. राजु आमले सर व ३६ स्वयंसेवकची निवड करण्यात आली आहे. क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या सिनीयर एक्झीकेटीव्ह सुगधा दानी यांनी फाऊंडेशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनाबद्दल मार्गदर्शन केले. तसेच १५ जुलै रोजी समाजातील लोकांना सायबर गुन्ह्याबाबत जागृती कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. २३ जुलै रोजी येथील पोलीस विभागातील सायबर सेलचे पीएसआय डिगंबर थोरात, हेड कॉन्स्टेबल दिलीप चिंचोले व पोलीस नाईक सचिन सोनवणे यांनी स्वयसेवकांना समाजात कशाप्रकारे गुन्हे घडतात व त्यापासून कसे वाचावे व काय उपाय योजना कराव्या याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच फाऊंडेशनचे स्वयंसेवक जळगाव, धुळे, नंदुरबार येथे सायबर सुरक्षा या वर जनजागृती करणार आहेत.